RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १२, अंक ५३] मंगळवार, जुलै १४, २०२६/आषाढ २३, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ९०**

**प्राधिकृत प्रकाशन**

### झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

**दिनांक १३ जुलै २०२६.**

**बृहन्मुंबईतील अनेक वर्षापासून रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील अंतिम परिशिष्ट-२ निर्गमित झाल्यानंतर त्यामधील झोपडीचे हस्तांतरण/खरेदी-विक्री करणाऱ्या झोपडीधारकांकरिता एकवेळची अभय योजना राबविण्याबाबत.**

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र.विसआ-२०२३/प्र.क्र.१५९/झोपनि-२, दि.०१/१०/२०२४.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई येथील अंतिम परिशिष्ट-२ हे दि.०१/०१/२०११ पूर्वी निर्गमित झालेल्या योजनेची माहिती खालील परिशिष्टाप्रमाणे आहे. सदर यादीतील योजनेच्या झोपडीधारकांना उपरोक्त शासन निर्णयातील अभय योजनेचा लाभ घेता येईल.

क्रमांक झोपुप्रा.मुंबई/राजपत्र/२०२६, दि.१३.०७.२०२६, जा.क्र.१५२५.— खालील योजनेच्या यादीतील परिशिष्ट-२ मधील ज्या झोपडीधारकांनी पुनर्वसन सदनिकेचा/गाळ्याचा ताबा घेतलेला आहे, पुनर्वसन सदनिकेचे वाटप झालेले आहे अशा झोपडीधारकांना अभय योजना लागू होणार नाही.

| अ.क्र. | योजनेचे नाव | न.भू.क्र. मौजे/तालुका | योजना स्वीकृत दिनांक | परिशिष्ट-II चा तपशील | योजनेची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री रामायण सह.गृह.संस्था | मौजे-मालवणी, ता.बोरीवली न.भू.क्र.६अ पैकी | १९.०४.२००६ | मा.अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे दि.२९/०८/२००७ | या योजनेस दि.१६/१०/२००९ रोजी आशयपत्र दिलेले असून, सद्यस्थितीत पुनर्वसन इमारतीत भागशः भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. |

**सचिन गिरी,**
सदस्य तथा सक्षम प्राधिकारी-५,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई.

**दिनेश महाजन,**
सदस्य सचिव तथा
कार्यकारी अभियंता पी/उत्तर, अभियांत्रिकी विभाग,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.